अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## ३२ वर्षांनी कृष्णेच्या कुशीत भरणार स्वारस्वतांची मांदियाळी

**पुणे** : आगामी ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फाउंडेशनला मिळाला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्या महामंडळाच्या पुणे येथे रविवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यासह सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित करण्यात आली होती. ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देऊन आली.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ, औदुंबर, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा इचलकरंजी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शाहूपुरी सातारा या संस्थांकडून निमंत्रणे आली होती. या स्थळांना भेटी दिल्यानंतर स्थळ निवड समितीची बैठक ८ जून रोजी सकाळी पुणे येथे संपन्न झाली. त्यात साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत स्थळ निवड समितीच्या निर्णयावर महामंडळाने एकमताने शिक्कामोर्तब केले.



# आजपासून सोलापूरची नवी झेप, गिरणगावच्या विकासाला नवे पंख..!

थांबायंच न्हाय गड्या, आता थांबायंच न्हाय..!

"सोलापूर आता थांबणार नाही!!"

सोलापूर धावणार आता वायुवेगाने!!!



## होटगी रोड विमानतळावरुन आजपासून नागरी विमानसेवा

- सोलापूरसह धाराशिव व लातूर जिल्ह्याच्या किमान एक कोटी लोकांवर होणार सकारात्मक परिणाम
- तब्बल १५ वर्षानंतर पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यासह मराठवाड्याचे परिवर्तन घडविणारा आज ऐतिहासिक क्षण



**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**होटगी रोड सोलापूर विमानतळावरून तब्बल १५ वर्षांच्या प्रतिक्षेअंती नागरी विमानसेवा सुरू होणार असून, हा ऐतिहासिक क्षण सोलापूर जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्याच्या दृष्टिकोनातून परिवर्तन घडवणारा ठरणार आहे. विशेष म्हणजे या सेवेमुळे सोलापूर, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांतील किमान एक कोटी नागरिकांचे जीवनमान आणि संधींची व्याप्ती यामध्ये आमूलाग्र बदल घडणार आहे.**

### संघर्ष अन् योगदान

सोलापुरातून विमान सेवा सुरु होणं या ऐतिहासिक घडामोडीमागे सोलापूर विकास मंचाचे अथक व निरंतर प्रयत्न आहेत, हे कोणाही नाकारु शकत नाही. त्यांच्या या प्रयत्नांना केंद्रीय हवाई वाहतूक विभाग, या विभागाचे मंत्री, महायुती सरकार पर्यायाने राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री, सोलापूरचे स्थानिक आमदार, या सरकारचं प्रशासन यांचे योगदान आहे. गेल्या पाच वर्षांपासून मंचच्या सदस्यांनी सातत्याने पाठपुरावा, जनजागृती, प्रशासनाशी बैठकांद्वारे हा प्रकल्प शक्य केला आहे. केंद्र सरकार, नागरी विमान वाहतूक मंत्रालय, विमान कंपन्यांशी सलग संपर्क ठेवून हा प्रकल्प साकार करण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला.आज सोलापूरकरांना स्वप्नवत वाटणारी विमानसेवा प्रत्यक्षात उभी राहिली, यामध्ये मंचच्या टीमची जिद्द आणि निष्ठा कौतुकास्पद राहिली.

### विमानसेवेचे दान सोलापूरकरांच्या पदारात टाकणारे मुख्यमंत्री देवाभाऊ आज कोणतं नवं दान टाकणार?

सोलापूरची विमानसेवा सुरु करण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पहिल्यापासून अग्रेसर राहिले. त्यांच्या अथक प्रयत्नातून इथली विमानसेवा सुरु होतेय. विमानसेवेचे दान सोलापूरकरांच्या पदरात टाकून इथल्या सर्वांगीण विकासाला 'ग्रीन' सिग्नल ते देणार आहेत. हे करताना सोलापूकरांच्या पदारात नव्याने ते कोणतं दान टाकतील, सोलापूरबद्दल कोणती नवी विकासाची पर्यायाने योजनांची घोषणा करतील, याकडे तमाम सोलापूरकरांचं लक्ष वेधलेले असणार आहे.

### सोलापूरच्या प्रगतीला कोणी रोखू न्हाय शकणार

स्वप्न बघणं पुरेसं नाही, त्यासाठी संघर्ष आणि कृती आवश्यक असते. सोलापूर विकास मंचसह विमानसेवा सुरु करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिलं त्यांनी हे दाखवून दिलंय. आता सोलापूरच्या प्रगतीला कुणीही थांबवू शकत नाही.

### सर्वांगीण विकासाची नवी दिशा

सोलापूरची विमानसेवा केवळ प्रवासाचा एक पर्याय नाही, तर ती औद्योगिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाची नांदी ठरणार आहे. औद्योगिकदृष्ट्या सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील उद्योजकांना देश-विदेशातील गुंतवणूकदारांशी थेट संपर्क साधता येणार असून, लॉजिस्टिक्सचा खर्च व वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. धार्मिक पर्यटनासाठी, सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर, तुळजापूर, औसा, आणि धाराशिव तसेच गाणगापूर सारखी श्रद्धास्थाने देशभरातील भाविकांसाठी अधिक सुलभ व सहज पोहोचण्याजोगी होतील. सांस्कृतिकदृष्ट्या या भागातील कला, लोकसंस्कृती, हस्तकला, आणि खाद्यपरंपरा देशभर पोहोचण्याची संधी मिळेल. सामाजिकदृष्ट्या शिक्षण, आरोग्य व नोकरीच्या संधींसाठी मोठी मदत होईल. ग्रामीण भागातील युवक-युवतींना मोठ्या शहरांत प्रवासासाठी एक सशक्त पर्याय मिळेल.

### आता पुढचे ध्येय आयटी पार्क

विमानसेवा ही सोलापूरसाठी ही केवळ सुरवात आहे. सोलापूर विकास मंच आता पुढचे ध्येय ठरवले आहे की, सोलापूरमध्ये आय.टी. पार्क मंजूर करून घेणे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून मान्यता मिळवून टी.सी.एस, इन्फोसिस, विप्रो, कॅप्जेमीनी सारख्या मोठ्या आय.टी. कंपन्यांचे युनिट्स सोलापुरात स्थापन करणे, हे पुढचे पाऊल आहे. यामुळे सोलापूरच्या हजारो तरुणांना त्यांच्या गावातच उच्च दर्जाच्या नोकऱ्यांच्या संधी मिळणार आहेत आणि स्थलांतर रोखता येणार आहे. थोडा संघर्ष आहेच, पण जसा विमानसेवा सुरू केली, तसंच हे स्वप्नही सत्यात उतरवणारच!

## राज्याभिषेक करून शिवरायांनी हिंदूंमध्ये स्फुल्लिंग पेटवले

### प्रा.सतिश कदम : शिवस्मारकतर्फे हिंदू साम्राज्यदिन सोहळ्यास उत्साहात

**सोलापूर/प्रतिनिधी**

श्री शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यात आज श्री शिवछत्रपतींना माल्यार्पण श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आज (सोमवारी) सकाळी ८.३० वाजता शिंदे चौक येथील शिवस्मारकमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांना माल्यार्पण करण्यात येणार आहे. यावेळी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी केले.



सोळाव्या शतकापर्यंत हिंदूंना आपला कोणीही वाली नाही असे वाटत होते. परकिय आक्रमकांच्या सत्तेमुळे त्यांना हिंदू राजा पुन्हा होईल हि आशाच नव्हती. अशा परिस्थितीत शिवरायांनी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर हिंदू राजा म्हणून राज्याभिषेक करवून घेत हिंदूंमध्ये स्फुल्लिंग पेटवले. त्यांनी राज्याभिषेक सोहळ्याद्वारे हिंदूंच्या सार्वभौम राज्याची एकप्रकारे पुन्हा पेरणीच केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास अभ्यासक प्रा.सतीश कदम यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे आयोजित श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याअंतर्गत रविवारी प्रा.डॉ. सतीश कदम यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान जुळे सोलापुरातील आय.एम.एस. शाळेच्या सभागृहात झाले.

प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस अभिवादन करून आणि दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे उद्घाटन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, संचालक प्रसाद जिरांकलीकर, संचालिका माधवी कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर उपस्थित होते.

यावेळी प्रा.डॉ. सतीश कदम यांनी सोलापूर व शिवरायांच्या संबंध सांगताना बार्शी तालुक्यातील पानगाव येथील पानसे घराण्यातील ८ मुले शिवरायांच्या सैन्यात असल्याचे सांगितले. छत्रपती शिवरायांच्या मनात स्थान असलेल्या संतांच्या यादीत धामणगावच्या बोधले बाबांचाही समावेश असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. राज्याभिषेकाच्या वेळी औरंगजेब अफगाणिस्तान मोहिमेवर होता. त्याला राज्याभिषेक रोखायचा म्हटले तरी किमान वर्षभराचा कालावधी लागणार होता. तसेच राज्याभिषेकानंतर पडणाऱ्या पावसात रायगडाच्या आजूबाजूच्या नद्या व खिंडी दुथड्या भरून वाहतात, त्यामुळे शत्रूच्या आक्रमणाचा विषयच येणार नाही म्हणून त्यांनी हा मुहूर्त निवडल्याचे त्यांनी सांगितले. राज्याभिषेकाचे ड्राफ्टींग म्हणजे शिवराज्याभिषेक व तुलादान हे दोन ग्रंथ आहेत. इंग्रजांना छत्रपतींना भेटण्यासाठी देखील नजराणा द्यायला लागायचा असा महाराजांचा प्रोटोकॉल होता. शिवराय म्हणजे हिंदुत्व याचे प्रखर उदाहरण म्हणजे दक्षिणेच्या मोहिमेत तिरूवनमल्लाईत महादेवांचे व विष्णुंचे मंदिर तोडून त्याठिकाणी उभी केलेले मुघलांचे प्रार्थनस्थळ शिवरायांनी पाडून त्याठिकाणी पुन्हा मंदिर उभे केले. शिवरायांची बसरूरची स्वारी पूर्णपणे वेगळी होती. त्यावेळी महाराजांनी एका गलबताचे वजन ७५० टन असलेली ३०० ते ३५० गलबते घेऊन त्यांनी ती स्वारी यशस्वी केली. अफलजखान वध, आग्राहून सुटका, शायिस्तेखान स्वारी या घटना महाराजांना सर्वत्र प्रसिध्दी देणाऱ्या ठरल्या. कित्तुर चनम्मा देवीला मदत केल्यामुळे तिने शिवरायांना देव मानले होते. म्हणूनच तिने मंदिरात छत्रपती व त्यांच्या आराध्यांची मूर्ती स्थापन केली होती. त्यावेळी ती छत्रपती शिवराय माझे प्रथम देव त्यानंतर माझे आराध्य माझे दुसरे देव असे ती सांगत असल्याचेही डॉ. कदम यांनी सांगितले. शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. संचालिका माधवी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन तर संचालक प्रसाद जिरांकलीकर यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी संचालक धनंजय कुलकर्णी उपस्थित होते.

## आषाढीच्या पालखी सोहळ्यांसाठी ६० कोटींची तरतूद

**नीरा** : यावर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागामार्फत ६० कोटींची तरतूद केली आहे. पावसाचे प्रमाण अधिक असल्याने पालखी मार्गावर ठिकठिकाणी निवारा शेड उभारल्या जातील. तसेच नीरा पालखी तळाच्या काँक्रिटीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी तत्काळ देत असून, तातडीने हे काम पूर्ण करण्याच्या सूचना पुणे जिल्हा परिषदेला दिल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा १९ जून रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहे. या सोहळ्याची प्रशासनातर्फे तयारी अंतिम टप्प्यात आहे. याची पाहणी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केली. पुणे जिल्ह्यातील नीरा विसावा स्थळाला भेट दिली असता, ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बरडे, तहसीलदार विक्रम राजपूत, जेजुरीचे सपोनि. दीपक वाकचौरे, नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, माजी बांधकाम सभापती दत्ता चव्हाण, बाळासाहेब भोसले, योगेंद्र माने, प्रमोद काकडे, उमेश चव्हाण, दीपक काकडे, साताराचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलिस अधीक्षक तुषार दोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखने, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, फलटणचे उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस, लोणंदचे सपोनि. सुशील भोसले यांच्यासह पुणे जिल्ह्यातील म हसूल, आरोग्य, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य व स्वच्छता विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

गोरे पुढे म्हणाले, मागील वर्षी ज्या-ज्या अडचणी आल्या त्या अडचणींचा अभ्यास करून प्रशासनाने यावर्षीच्या पालखी सोहळ्याची सर्व तयारी केली आहे. पावसामध्ये वारकऱ्यांसाठी निवारा ठिकाणे असावीत, अशा सूचना मुख्यमंत्र्यांच्या होत्या. त्यानुसार जर्मन अँगल वापरून यावर्षी आम्ही सात ते आठ लाख स्क्वेअर फुटाची निवारा व्यवस्था निर्माण करत असल्याचेही गोरे यांनी म्हटले आहे.

पालखीची खूप चांगली तयारी केली आहे. सर्व अडचणींवर मार्ग काढण्याचे काम प्रशासन व आम्ही सर्वजण करत आहोत. चालूवर्षी पाऊस खूप झाला आहे. या पावसामुळे छोटे-मोठे नुकसान झाले आहे, रस्ते खराब झाले आहेत, पालखी तळांवर पाणी साठले आहे. फलटण तालुक्यातील तरडगावचा संपूर्ण पालखी तळ पाण्यात गेला आहे. तो दुरुस्त करण्यास सांगितले आहे. त्यासाठी दीड कोटी खर्च येणार आहे. दहा दिवसांत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

पंढरपूर वाखरीमध्ये काय अडचणी होत्या, त्या सर्वांना पर्यायी व्यवस्था करायचं काम चालू आहे. पावसामध्ये वारकऱ्यांसाठी काही निवारा ठिकाणे तयार केली पाहिजेत, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

### स्वागत कमानी व स्टेज नकोच

स्वागत कमानीचा विषय नव्हता. काही ठिकाणी लोक स्वागत कमानी उभ्या करतात आणि त्याठिकाणी स्टेज घालून वाहतुकीला अडथळा निर्माण करतात. डीजे लावतात त्याचा कर्कश असा आवाज येतो. या संदर्भात आळंदी पालखी विश्वस्तांकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही केली आहे.

### सरकारचे आठ ते दहा कोटी वाचले

शौचालय टेंडर सोलापूर जिल्ह्यावरून पुणे जिल्ह्याला. त्याच्या पाठीमागे काही स्टेटस नाही. गेल्या काही वर्षांपासून हे टेंडर पुण्यात होते. आताही आम्ही पुण्यातच केले. सोलापूरला डिव्हाईड करून काय करता येते का? याचा प्रयत आपण केला होता. काही गोष्टींत आपण त्या टेंडरमध्ये मोनोपोली होती त्याला छेद देत निर्णय घेतले. त्यामुळे चालूवर्षी सरकारचे आठ ते दहा कोटी रुपये वाचले. मागील वर्षी टेंडर साधारण २४-२५ कोटी रुपयांचं होतं, ते वाढवून आता २७-२८ कोटी रुपयांचं होत होतं. ते आता १५-१६ कोटींवर येईल.








## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हे तुमचे आरोप !!!

## सोलापूर शहरात मृग नक्षत्राची दमदार हजेरी

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर गेल्या दहा दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने रविवारी रात्री सोलापूर शहर व परिसरात हजेरी लावली रविवारी मृग नक्षत्राला सुरुवात झाली त्यानंतर रात्री जोरदार पर्जन्यवृष्टी झाली ग नक्षत्राने पहिल्याच दिवशी दिलासा दिला रविवारी दुपारपासून उन्हाचे चटके जाणवत होते तसेच उखाडा ही जाणवला त्यामुळे पाऊस येण्याचा अंदाज सोलापूरकरांना लावून होता तो अखेर खरा ठरला सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात खरीपाच्या निम्म्या पेरण्या झाल्या आहे त्यामुळे हा पाऊस या पिकांना पोषक ठरणार आहे.

